राज्यस्तरीय, विभागस्तरीय व जिल्हास्तरीय खरेदीसमिती स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांक - मराग्रं-२५११/(प्र. क्र.२३५/१५)/साशि-५,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : १९ जानेवारी, २०१६

<u>वाचा :</u> १) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग III/उद्योग ४, दि ३०/१०/२०१५.

२) ग्रंथालय संचालनालयाचे पत्र क्र.५५/ख.स/२०१५-१६/१८८७२, दिनांक ०८/०१/२०१६

<u>प्रस्तावना:</u>

शासकीय / निमशासकीय कार्यालयातील विविध साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका उद्योग ऊर्जा व कामगार विभागाने संदर्भ १ येथील शासन निर्णयानुसार निर्गमित करण्यात आलेली आहे. त्यानुसार सर्व खरेदीदार विभागांनी त्यांना लागणाऱ्या वस्तूंची खरेदी नियमपुस्तिकेत दिलेल्या कार्यपध्दतीनुसार करावयाची आहे. सदर नियमपुस्तिका दि ०१/११/२०१५ पासून लागू करण्यात आलेली आहे. नियमपुस्तिकेतील परिच्छेद २.९.२ मध्ये नमूद केल्यानुसार सर्व प्रशासकीय विभागांना खरेदी प्रक्रिया पार पाडता यावी यासाठी प्रत्येक प्रशासकीय विभाग / कार्यालयाअंतर्गत खरेदी समिती गठीत करावयाची आहे. तसेच परिच्छेद २.९.३ मध्ये नमूद केल्यानुसार विभागस्तरावर / जिल्हास्तरावर संबंधित खरेदीदार विभागांनी खरेदीसमिती स्थापन करावयाची आहे. त्यासाठी नियम ११ नुसार खरेदीदार प्रशासकीय विभागांनी / कार्यालयांनी खरेदी करण्यापूर्वी प्रशासकीय आदेश काढणे आवश्यक आहेत.

वित्तीय नियमावलीनुसार प्रशासकीय विभाग / कार्यालय प्रमुख यांना असलेलया वित्तीय मर्यादेपर्यत प्रशासकीय मान्यता दयावी अशी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार ग्रंथालय संचालनालयाअंतर्गत राज्यस्तरीय, विभागस्तरीय व जिल्हास्तरीय खरेदी समित्या स्थापन करुन त्यांना खरेदीच्या वित्तीय मर्यादेचे अधिकार प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासननिर्णय:

ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन मुंबई व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयाकरिता साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी राज्यस्तरीय, विभागस्तरीय व जिल्हास्तरीय खरेदी समित्या खालीलप्रमाणे गठीत करण्यात येत आहेत.

अ) **(नियम २.९.२.) <u>राज्यस्तरीय खरेदी समिती</u>** :-

अनु. क्र	**समितीची रचना**	**पदनाम**	**पद**
१	विभाग प्रमुख / प्रशासकीय विभागाचा प्रमुख	उपसचिव (साशि ५)	अध्यक्ष
२	संबंधित खरेदीदार विभाग/ कार्यालयाचा खरेदीप्रक्रिया हाताळणारा गट अ दर्जापेक्षा कमी नसलेला ज्येष्ठ अधिकारी	ग्रंथालय संचालक	सदस्य सचिव
३	लेखा व कोषागार संचालनालयातील गट **अ** किंवा गट **ब** दर्जाचा लेखाधिकारी	किमान सहसंचालक दर्जाचा वित्त व लेखा अधिकारी	निमंत्रित
४	उदयोग सहसंचालक (भांख) / उदयोग संचालनालयाचा प्रतिनिधी	उद्योग सहसंचालक (भांख) / प्रतिनिधी	निमंत्रित
५	अन्य विभागाकडून कोणताही निमंत्रित (आवश्यकता असल्यास)	-	निमंत्रित
६	तांत्रिक तज्ञ (आवश्यकता असल्यास)	-	निमंत्रित

ब) (नियम २.९.३.अ.) <u>विभागीयस्तरीय खरेदी समिती</u> :- सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालय

अनु. क्र	**समितीची रचना**	**पदनाम**	**पद**
१	संबंधित विभाग प्रमुख/ प्रादेशिक प्रमुख	ग्रंथालय संचालक	अध्यक्ष
२	उद्योग सहसंचालक (विभागीय कार्यालय) / प्रतिनिधी	सदस्य	सदस्य
३	विभागीय अधिकारी (लेखा व कोषागारे विभाग) /प्रतिनिधी	वित्त व लेखाधिकारी	सदस्य
४	संबंधित खरेदीदार विभागाचा खरेदी अधिकारी	सहाय्यक ग्रंथालय संचालक	सदस्य सचिव

क) (नियम २.९.३.ब) <u>जिल्हास्तरीय खरेदी समिती</u> :- (राज्य मध्यवर्ती ग्रंथालये, शासकीय विभागीय ग्रंथालयांची कार्यालये व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालये)

अनु. क्र	**समितीची रचना**	**पद**	**राज्य मध्यवर्ती ग्रंथालये व शासकीय विभागीय ग्रंथालयांचे कार्यालय (पूणे व नागपूर)**	**शासकीय विभागीय ग्रंथालयांची कार्यालये (नाशिक, औरंगाबाद, अमरावती, (रत्नागिरी) कोकण), व डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मृती ग्रंथालये, दापोली तसेच सर्व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालये**
१	संबंधित खरेदीदार विभागाचा जिल्हा कार्यालय प्रमुख	अध्यक्ष	ग्रंथपाल गट अ	सहाय्यक ग्रंथालय संचालक
२	महाव्यवस्थापक (जिल्हा उद्योग केंद्र) प्रतिनिधी	सदस्य	सदस्य	सदस्य
३	लेखा व कोषागारे या कार्यालयाचा गट अ/ गट ब दर्जाचा अधिकारी/ प्रतिनिधी	सदस्य	वित्त व लेखाधिकारी	वित्त व लेखाधिकारी
४	संबंधित खरेदीदार विभागाचा खरेदी अधिकारी	सदस्य सचिव	ग्रंथपाल गट ब	जिल्हा ग्रंथालय अधिकारी/ ग्रंथपाल गट ब/ जिल्हा ग्रंथपाल (कार्यालय प्रमुख)

वरील समित्यांमधील शासकीय विभाग/ कार्यालय प्रमुख यांना वित्तीय नियमावलीनुसार असलेल्या वित्तीय मर्यादेपर्यत खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर समित्यांनी उदयोग ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय क्र भाखस २०१४/प्र. क्र.८२/भाग ।।। उदयोग ४, दि ३०/१०/२०१५ नुसार निर्गमित केलेल्या नियमपुस्तिकेमधील तरतूदीनुसार कार्यवाही करावी.

हा शासन निर्णय शासनाचे www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१६०११९१५०८४८१५०८ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Paraji Malikarjun Takate

Digitally signed by Paraji Malikarjun Takate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Paraji Malikarjun Takate
Date: 2016.01.19 15:12:31 +05'30'

(पा. म. ताकटे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल-१ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / नागपूर
३) प्रधान सचिव(उवतंशि) यांचे स्वीय सहाय्यक
४) ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५) कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६) कक्ष अधिकारी, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
७) जिल्हा कोषगार अधिकारी (सर्व)
८) ग्रंथपाल, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय (ग्रंथालय संचालनालयांमार्फत)
९) सर्व सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालये
१०) सर्व शासकीय विभागीय ग्रंथालय कार्यालये
११) सर्व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालये/डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती ग्रंथालये दापोली, रत्नागिरी
१२) निवडनस्ती (साशि-५)